जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ नॅनोसायन्स विभागात २ मेपासून 'ओपन डे'चे आयोजन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये यंदाही उच्च व तंत्रज्ञान अधिविभागामार्फत निर्देशित केलेल्या स्कूल व कॉलेज कनेक्ट फेज-२ अंतर्गत दि. २ व ३ मे रोजी 'ओपन डे' चे आयोजन करण्यात आले आहे. स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी हा अधिविभाग सुरुवातीपासूनच नवनवीन विज्ञान प्रकल्प आणि उपक्रम राबविण्यात अग्रेसर आहे. २ मे रोजी वैज्ञानिक पोस्टर कॉम्पिटिशन व ३ मे रोजी वैज्ञानिक मॉडेल कॉम्पिटिशन असणार आहे. स्पर्धा दोन गटांत होणार असून, बारावी सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांचा एक गट व कोणत्याही विज्ञान विषयाच्या पदवी शाखेतील विद्यार्थ्यांचा दुसरा गट असणार आहे. नॅनोसायन्स व नॅनोतंत्रज्ञानावर आधारित विज्ञान-प्रदर्शन सर्वांसाठी खुले असणार आहे. स्पर्धांचे परीक्षक म्हणून भाभा अनुसंधान संशोधन केंद्र, मुंबई येथील शास्त्रज्ञ डॉ. नंदिता मयती, डॉ. नीलोत्पल बरूआ उपस्थित राहणार आहेत. स्पर्धेनंतर शास्त्रज्ञांची व्याख्याने होणार आहेत, अशी माहिती स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाचे संचालक प्रा. डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
पुण्यनगरी

# 'नॅनोसायन्स'मध्ये २ मे रोजी 'ओपन डे'


कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये उच्च व तंत्रज्ञान अधिविभागामार्फत निर्देशित स्कूल व कॉलेज कनेक्ट फेज २ अंतर्गत दि. २ व ३ मे रोजी 'ओपन डे'चे आयोजन केले आहे.



यामध्ये पहिल्या दिवशी वैज्ञानिक पोस्टर कॉम्पिटिशन आणि दुसऱ्या दिवशी वैज्ञानिक मॉडेल कॉम्पिटिशन असणार आहे. स्पर्धा दोन गटात होणार असून, इयत्ता बारावी सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांचा एक गट, तर पदवी शाखेचा दुसरा गट असणार आहे. या दोन्ही दिवशी नॅनोसायन्स आणि नॅनोतंत्रज्ञानावर आधारित विज्ञान-प्रदर्शन सर्वांसाठी खुले असणार आहे. या स्पर्धांचे परीक्षण भाभा अनुसंधान संशोधन केंद्र, मुंबई येथील शास्त्रज्ञ डॉ. नंदिता मयती, डॉ. नीलोत्पल बरुआ हे करतील, अशी माहिती अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024

पुढारी



कोल्हापूर : विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागामधील नामांकित कंपनीत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसमवेत शिक्षक. (छाया : पप्पू अत्तार)

# शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या १० विद्यार्थ्यांची निवड

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामधील दहा विद्यार्थ्यांची इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद कंपनीत कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये निवड झाली. ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाच्या प्रयत्नाने ही निवड झाली. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर गणेश पाटील, सहायक प्रा. सतीश काळे व सागर पोर्लेकर यांनी केले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली, मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रामचे समन्वयक डॉ. अभिजित कोळेकर, सेंट्रल प्लेसमेंट सेल ऑफिसर डॉ. राजन पडवळ यांनी अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
पुण्यनगरी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापक.

# 'तंत्रज्ञान'च्या १० विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये इंडो जर्मन टूल रूम, औरंगाबाद या कंपनीचा कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह झाला. यामध्ये मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्राममधील १० विद्यार्थ्यांची नोकरीसाठी निवड करण्यात आली. या विद्यार्थ्यांमध्ये प्राची पावसकर, ऋषीकेश पदमन, संदीप आंभोरे, संदीप बोलंगे, सुजित रणदिवे, मोहनीश लोहार, अजय गुजले, प्राची चव्हाण, निकिता दुधाळ, शुभम कारीदकर यांचा समावेश आहे. याचे आयोजन ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर गणेश पाटील, सहा. प्राध्यापक सतीश काळे व सागर पोर्लेकर यांनी केले. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली, मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रामचे समन्वयक डॉ. अभिजित कोळेकर आणि सेंट्रल प्लेसमेंट सेल ऑफिसर डॉ. राजन पडवळ यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
तरुण भारत

# दहा विद्यार्थ्यांची 'इंडो जर्मन टुल'साठी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागामध्ये झालेल्या कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह पार पडला. यामध्ये विभागातील दहा विद्यार्थ्यांची औरंगाबाद येथील इंडो जर्मन टुल रूमसाठी मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रॅम अभ्यासक्रमाच्या दहा विद्यार्थ्यांची निवड झाली आहे. या निवडीसाठी ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाने विशेष प्रयत्न केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये प्राची पावसकर, ऋषिकेश पदमन, संदीप आंभोरे, संदीप बोलंगे, सुजित रणदिवे, मोहनीश लोहार, अजय गुजले, प्राची चव्हाण, निकिता दुधाळ, शुभम कारीदकर यांचा समावेश आहे. ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर गणेश पाटील, प्रा. सतीश काळे व सागर पोर्लेकर यांनी यांनी संपूर्ण नियोजन केले होते. यापूर्वीही अनेक महाराष्ट्रातील कंपन्यांमध्ये निवड झाली आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, तंत्रज्ञान अधीविभाग संचालक डॉ. एस. एन. सपली, मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्रामचे समन्वयक डॉ. अभिजीत कोळेकर, सेंट्रल प्लेसमेंट सेल ऑफिसर डॉ. राजन पडवळ यांचे मार्गदर्शन लाभले.



कोल्हापूर : औरंगाबाद येथील इंडो जर्मन टुल रूमसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांबरोबर शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील शिक्षक.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
लोकमत


# तंत्रज्ञान अधिविभागाच्या १० विद्यार्थ्यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील तंत्रज्ञान अधिविभागातील मेकॅनिकल इंजिनिअरिंग प्रोग्राममधील १० विद्यार्थांची इंडो जर्मन टूल रूम कंपनीत निवड झाली. यात प्राची पावसकर, हृषिकेश पद्मन, संदीप आंभोरे, संदीप बोलंगे, सुजित रणदिवे, मोहनीश लोहार, अजय गुजले, प्राची चव्हाण, निकिता दुधाळ, शुभम कारीदकर यांचा समावेश आहे. कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर गणेश पाटील, सहाय्य प्राध्यापक सतीश काळे व सागर पोर्लेकर यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात गुरूवारी 'ओपन डे'चे उद्‌घाटन

■ वैज्ञानिक पोस्टर व वैज्ञानिक प्रकल्पांच्या स्पर्धा होणार



प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागामध्ये उच्च व तंत्रज्ञान अधिविभागामार्फत निर्देशीत स्कुल व कॉलेज कनेक्ट फेज २ अंतर्गत २ व ३ मे रोजी "ओपन डे"चे आयोजन केले आहे. या उपक्रमात शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रासह बाहेरील विद्यार्थी व पालक सहभाग नोंदवतात. यातून विज्ञानाची गोडी असणाऱ्या 'ओपन डे' हा विज्ञानपूरक उपक्रम आहे.

गुरूवात २ मे रोजी वैज्ञानिक पोस्टर कॉम्पिटिशन आणि शुक्रवार ३ मे रोजी वैज्ञानिक मॉडेल कॉम्पिटिशन असणार आहे. ही स्पर्धा दोन गटात होणार असून इयत्ता बारावी सायन्स शाखेतील विद्यार्थ्यांचा एक गट व कोणत्याही विज्ञान विषयाच्या पदवी शाखेतील विद्यार्थ्यांचा दुसरा गट असणार आहे. तसेच या दोनही दिवशी नॅनोसायन्स आणि नॅनोतंत्रज्ञानावर आधारित विज्ञान-प्रदर्शनही, सर्वांसाठी खुले असणार आहे. या स्पर्धांचे परीक्षक म्हणून भाभा अनुसंधान संशोधन केंद्र, मुंबई येथील शास्त्रज्ञ डॉ. नंदिता मयती आणि डॉ. नीलोत्पल बरूआ हे आवर्जून उपस्थित राहणार आहेत. शुक्रवार ३ मे रोजी विज्ञान प्रदर्शन व विविध वैज्ञानिक प्रकल्पांच्या सादरीकरणांनंतर या 'ओपन डे' ची सांगता होणार आहे. स्पर्धेनंतर दोन दिवस दोनही शास्त्रज्ञांची व्याख्याने होणार आहेत, तरी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी, पालकांनी व विज्ञानात रुची ठेवणाऱ्या प्रत्येकाने या ओपन डे प्रोग्रामचा लाभ घ्यावा, असे आवाहन, स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024

पुण्यनगरी

# मणिपूरच्या विद्यार्थिनीचे 'नॅनोसायन्स' मध्ये यश



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या अधिविभागाची विद्यार्थिनी रिना सौबाम हिची पुणेस्थित 'स्प्रिंजर-नेचर' या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशन कंपनीत, वैज्ञानिक संपादक म्हणून निवड झाली आहे. रिना ही मूळची इम्फाळ, मणिपूर येथील रहिवासी असून, तिने स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथेच 'बीएस्सी-एमएस्सी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी' हा पाच वर्षांचा एकत्रित अभ्यासक्रम २०१७ ते २०२२ या कालावधीमध्ये पूर्ण केला आहे. या अभ्यासक्रमाच्या पूर्णतेनंतर लगेचच तिची निवड झाली. तिच्या प्रगतीचा आलेख पाहून मणिपूरमधील आणखी ७ विद्यार्थ्यांनी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजीला प्रवेश घेतल्याची माहिती अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
सकाळ

# मणिपूरच्या विद्यार्थिनीचे 'नॅनोसायन्स'मध्ये यश

सकाळ वृत्तसेवा



रीना सौबाम

कोल्हापूर, ता. २९ : शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी अधिविभागात नॉर्थ ईस्टमधून शिकण्यास आलेली पहिली आंतरराज्य विद्यार्थिनी रीना सौबाम हिने 'नॅनोसायन्स'मध्ये यश मिळविले आहे. हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर लगेचच तिची पुणेस्थित 'स्प्रिंजर-नेचर' या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशन कंपनीत, वैज्ञानिक संपादक म्हणून निवड झाली आहे.

मूळची इंफाळ (मणिपूर) येथील असलेल्या रीना हिने स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथे बीएस्सी., एम. एस्सी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी हा पाच वर्षांचा एकत्रित अभ्यासक्रम सन २०१७ ते २०२२ दरम्यान पूर्ण केला आहे. 'स्प्रिंजर नेचर' ही वैज्ञानिक माहिती आणि संशोधनाचे शोधपत्र, विवरण प्रकाशित करणारी कंपनी आहे.

-पुणे येथे या स्प्रिंजर नेचर कंपनीची एक शाखा कार्यरत असून, तिथून जगभरातील संशोधन पत्रिकेचा लेखाजोखा आणि विवरण उपलब्ध करून देण्यात येते. अभ्यासक्रमाचा भाग असणाऱ्या रिसर्च आर्टिकल रीडिंग रायटिंग आणि सेमिनार या उपक्रमामुळे हे यश मिळविता आले असल्याचे मत तिने व्यक्त केले. तिच्या पाठोपाठ मणिपूरमधील आणखी सात विद्यार्थ्यांनी नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला आहे.

30 APR 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नॅनो सायन्सच्या रीना सौबामचे यश

## पुण्यातील 'स्प्रिंजर नेचर' वैज्ञानिक संशोधन कंपनीत संपादकपदी निवड

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील नॅनोसायन्स अँड



बायोटेक्नॉलॉजी हा अधिविभाग शास्त्रीय तथा संशोधकीय घडामोडींसाठी कायमच चर्चेत असतो. येथील विद्यार्थ्यांनी तसेच प्राध्यापकांनी अनेक राष्ट्रीय तथा आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेलं आहे. या अधिविभागातील नॉर्थ ईस्टमधून शिक्षणास आलेली विद्यार्थिनी रीना सौबामची पुणे येथील 'स्प्रिंजर–नेचर' या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशन कंपनीत, वैज्ञानिक संपादक म्हणून निवड झाली आहे. तिच्या या यशाबद्दल शिवाजी विद्यापीठाकडून तिचे अभिनंदन करण्यात आले.

रीना मूळची इंफाळ, मणिपूर येथील रहिवासी असून तिने स्कूल ऑफ नॅनोसायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी येथेच (बीएस्सी ओएम एस्सी) नॅनोसायन्स अँड टेक्नॉलॉजी हा पाच वर्षांचा एकत्रित अभ्यासक्रम २०१७ ते २०२२ दरम्यान पूर्ण केला आहे. त्यानंतर रीनाची पुण्यातील 'स्प्रिंजर–नेचर या आंतरराष्ट्रीय संशोधन प्रकाशन कंपनीत, वैज्ञानिक संपादक म्हणून निवड झाली आहे.

### नॅनोसायन्सच्या प्रवेश प्रक्रियेला प्रारंभ

आताच्या पिढीतील विद्यार्थी मूळचेच सृजनशील असून त्यांच्यातील वैज्ञानिक सर्जनशीलतेला अधिकाधिक वाव मिळावा. नॅनोटेक्नॉलॉजी बरोबरच विविध बहुविधा क्षेत्रात विद्यार्थ्यांना यश संपादन करता यावे आणि त्यांची वैज्ञानिक प्रगल्भता वाढीस लागावी, या उद्देशाने स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड बायोटेक्नॉलॉजी या आधीविभागात, बारावी सायन्स नंतर कोणत्याही प्रवेश परीक्षेशिवाय, पाच वर्षांचा बीएससी–एमएससी एकत्रित अभ्यासक्रम सन २०१२ पासून सुरू असून त्यासाठी प्रवेश घेवू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी २०२४–२५ साठीची प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे, तरी इच्छुकांनी प्रवेश घ्यावा असे आवाहन अधिविभागाचे संचालक डॉ. किरणकुमार शर्मा यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाच्या वतीने १६० उन्हाळी सत्रातील परीक्षांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या १६० परीक्षांचे निकाल जाहीर झाले आहे.

सोमवारी मास्टर ऑफ सायन्स, मास्टर ऑफ कॉमर्स, मास्टर ऑफ सोशल वर्क, डिप्लोमा इन टॅक्सेशन, डिप्लोमा इन इंटरनॅशनल रिलेशन, सर्टिफिकेट कोर्स इन जॅपनीज लॅग्वेज आदी २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. दि.२९ रोजी एमए (योगा), बीसीए, सर्टिफिकेट कोर्स इन जर्मन लॅग्वेज आदी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024

पुण्यनगरी

# विद्यापीठाच्या १६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा दि. २१ मार्चपासून सुरू आहेत. दरम्यान, अभ्यासक्रमांचे निकाल लावण्याचे कामही परीक्षा विभागाकडून सुरू आहे. सोमवारी यापैकी १६ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले, तर आजअखेर १६० अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. दिवसभरात विविध २४ अभ्यासक्रमांच्या परीक्षा विविध महाविद्यालयांमध्ये पार पडल्या. या परीक्षांसाठी ५ हजार ९०९ विद्यार्थ्यांपैकी ७०७ विद्यार्थी अनुपस्थित होते. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथकांची स्थापना करण्यात आली आहे. या पथकांकडून जिल्ह्यातून एका गैरप्रकाराची प्रत्यक्ष नोंद परीक्षा प्रमाद समितीमार्फत केली आहे.

30 APR 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पीएच.डी. मार्गदर्शकांकडून मागविली जागांची माहिती

## 'नेट' परीक्षेच्या माध्यमातून प्रवेश प्रक्रिया राबविणार; शिवाजी विद्यापीठाची तयारी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २९ : कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांतील पीएच. डी. अभ्यासक्रमांच्या प्रवेशाची प्रक्रिया विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) निर्देशानुसार राबविण्याची तयारी शिवाजी विद्यापीठाने सुरू केली आहे. त्यातील पहिला टप्पा म्हणून विद्यापीठाने पीएच.डी. गाईड (मार्गदर्शक) यांच्याकडे उपलब्ध असलेल्या जागांची माहिती मागविली आहे.



यूजीसीने राष्ट्रीय पात्रता परीक्षेला (नेट) पीएच.डी. प्रवेश परीक्षेचा दर्जा दिला आहे. या परीक्षेच्या माध्यमातून विद्यापीठांनी पीएच.डी. प्रवेशाची कार्यवाही करावयाची आहे. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाने तयारीची सुरुवात केली आहे. विविध विद्याशाखांतील पीएच.डी. अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी विद्यापीठाच्या पातळीवर आतापर्यंत स्वतंत्रपणे पीएच.डी. प्रवेश परीक्षा (पेट) घेतली जात होती. मात्र, यूजीसीच्या सूचनेनुसार आता 'पेट' परीक्षा विद्यापीठ बंद करणार आहे. 'नेट'नुसार प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार असून त्याचे स्वरूप निश्चित करणार आहे. त्याबाबत विद्यापीठाच्या विद्या आणि व्यवस्थापन परिषदेमध्ये चर्चा करून पुढील कार्यवाही होणार आहे. दरम्यान, सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील पीएच.डी. प्रवेशाची प्रक्रिया विद्यापीठातील अधिविभागांच्या पातळीवर सध्या सुरू आहे. त्यात संशोधन सल्लागार समितीची बैठक, लेखी आणि मुलाखतीनंतर गुणवत्ता यादी, अंतिम निवड यादीची प्रसिद्धी आदींचा समावेश आहे.

| विद्यापीठातील वर्षनिहाय पीएच.डी. प्रवेशित विद्यार्थी | |
|---|---|
| २०१६-१७ | ७०७ |
| २०१७-१८ | ६८९ |
| २०१८-१९ | ५४७ |
| २०१९-२० | ५०९ |
| २०२०-२१ | ५६१ |
| २०२१-२२ | ५६४ |

### प्रथम वर्ष प्रवेश अर्ज करण्यास मुदतवाढ

■ सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात विद्यापीठ अधिविभाग व संलग्नित महाविद्यालयांतील एम.एससी. आणि विद्यापीठ अधिविभागांमधील एम.ए., एम.कॉम., एम.ए. संगीत, एलएलएम., मास्टर ऑफ रुरल स्टडीज, एम.लिब., एम.एससी. मॅथेमॅटिक्स विथ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन), एमसीए (कॉम्प्युटर सायन्स), एमबीए (डिस्टन्स मोड), बीसीए., बी.ए. स्पोर्टस्, फिल्म मेकिंग, बी.कॉम. बँकिंग अँड फायनान्स आदी अभ्यासक्रमांच्या भाग एकच्या प्रवेश परीक्षेसाठी १० मेपर्यंत आणि ज्या अभ्यासक्रमांना प्रवेश परीक्षा नाही अशा अभ्यासक्रमांना प्रवेश अर्ज भरण्यासाठी २५ मेपर्यंत मुदतवाढ दिली असल्याची माहिती कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी दिली.

### जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुदत

■ विद्यापीठातील पीएच.डी. प्रवेशाची प्रक्रिया यूजीसीच्या निर्देशानुसार राबविली जाणार आहे. लेखीपरीक्षेनंतर मुलाखत आणि अन्य प्रक्रियेचे स्वरूप अधिकार मंडळांकडून घेतला जाणार आहे. सध्या पीएच.डी. गाईडकडे असणाऱ्या रिक्त जागांची माहिती मागविली आहे. त्यासाठी जूनच्या पहिल्या आठवड्यापर्यंत मुदत दिली असल्याचे 'पीजीबीयूटीआर' विभागाचे उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांनी सांगितले.

### पहिल्या श्रेणीतील विद्यार्थ्यांची मुलाखत

■ 'नेट'परीक्षेत तीन श्रेणी ठरविण्यात आल्या आहेत. त्यामधील पहिल्या श्रेणीत सर्वाधिक गुण असणारे विद्यार्थी राहणार आहेत. पीएच.डी. प्रवेश आणि पाठ्यवृत्तीसह जेआरएफ, सहायक प्राध्यापक पदासाठी ते पात्र ठरणार आहेत. त्यांना पीएच.डी. प्रवेशासाठी मुलाखत द्यावी लागणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
30 APR 2024

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील परीक्षा सुरळीत

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल-२०२४ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा सुरु आहेत. सोमवारी आणखी १६ अभ्यासक्रमाचे निकाल जाहीर झाले. सोमवारी झालेल्या २४ विषयांच्या परीक्षेला ५ हजार ९०९ पैकी ५ हजार २०२ विद्यार्थी उपस्थित होते. तर ७०७ विद्यार्थी अनुपस्थित होते. भरारी पथकाकडून तिन्ही जिल्ह्यातून कॉपीच्या प्रकाराची एकही नोंद झालेली नाही. परीक्षा प्रमाद समितीच्या नियमानुसार परीक्षा होत आहेत.